


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०४ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार २२/०८/२०२६ । पाने - ६





दत्तमंदिर स्टॉप नाशिक रोड. 7774084019

वाजे पेट्रोल पंप समोर, सिन्नर 8983275498

यशोधन कार्यालया समोर, संगमनेर 9156009908

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी

१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# साखर झाली ८० रूपये, सुट्टे तेल विक्री बंद




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात साखरेच्या दराने मोठी उसळी घेतली असून काही भागांत किरकोळ बाजारात साखरेचा दर तब्बल ८० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. साखरेचा घाऊक दर ७ हजार ५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत गेल्याने सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर त्याचा थेट परिणाम होऊ लागला आहे. आगामी काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचा दर ८० रुपये किलोपर्यंत, तर हिंगोलीत ७५ रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. साखरेच्या दरवाढीचा परिणाम मिठाई व्यवसायावरही होऊ लागला आहे. पेढे, बर्फी, गुलाबजामुन, जिलेबी, लाडू आदी मिठाई तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर केला जात असल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे आगामी काळात मिठाईच्या दरातही वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भेसळ, निकृष्ट दर्जाचे तेल आणि ग्राहकांची दिशाभूल रोखण्यासाठी राज्यात सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. शुक्रवारपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार असून, सुट्या तेलाची विक्री, वापरलेल्या डब्यांमध्ये तेलाचे पुनर्भरण तसेच तळणीच्या तेलाचा पुनर्वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

खाद्यतेलाची विक्री आता पूर्ण व स्पष्ट लेबल असलेल्या सीलबंद पॅकिंगमधूनच करावी लागणार आहे. तेल उत्पादक, रिफायनर्स, ब्लेंडर्स, री-पॅकर्स, आयातदार, घाऊक व किरकोळ विक्रेते, किराणा दुकाने, सुपरमार्केट तसेच ई-कॉमर्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सनाही हे नियम लागू असतील. वापरलेल्या किंवा गंजलेल्या डब्यांमध्ये तेलाचे पुनर्भरण करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच घातक रसायने, खनिज तेल किंवा अखाद्य पदार्थ वाहून नेण्यासाठी वापरलेले टँकर खाद्यतेलाच्या वाहतुकीसाठी वापरता येणार नाहीत. एफडीएच्या राज्यव्यापी तपासणीत खाद्यतेलाच्या साखळीत परवान्याविना व्यवसाय, भेसळ आणि चुकीचे लेबल लावण्याचे प्रकार आढळले. तपासणीत ७७ नमुने निकृष्ट दर्जाचे, १३ असुरक्षित तर १५ नमुने बनावट लेबलचे आढळले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, प्रकरणाच्या स्वरूपानुसार ७ वर्षांपासून जन्मठेपेपर्यंत कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

# जखमी विद्यार्थ्यांसोबत राहुल गांधी पोलीस ठाण्यात, अखेर गुन्हा दाखल



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात पॅलेट गनचा वापर करण्यात आला होता. त्याची चौकशी सुरू आहे. हे प्रकरण कुठवर आलं याची माहिती घेण्यासाठी राहुल गांधी पोलीस ठाण्यात आले. यावेळी राहुल गांधी हे पॅलेट गन पीडित साहिल लोहबच यालाही घेऊन पोलीस ठाण्यात गेले. या प्रकरणात अद्याप पोलिसांनी एफआयआर दाखल करून घेतला नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. त्यामुळे गुन्हा दाखल करावा अशी मागणी जखमी तरुणाच्या वतीने राहुल गांधी यांनी लावून धरली. पोलिस सुरवातीला तयार नव्हते त्यामुळे राहुल गांधी जखमी तरुणासोबत पोलीस ठाण्याबाहेर ठाण मांडून बसले. अखेर उशिरा संसद भवन पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावेळी पॅलेट गनचा वापर करण्यात आला आहे. त्याची चौकशी सुरू आहे. पॅलेट गन पीडित तरुणासोबत तब्बल अर्धा तास राहुल गांधी पोलीस ठाण्यात होते. यावेळी खा. प्रियंका गांधी देखील उपस्थित होत्या. त्यांनी एफआयआर दाखल करून घेण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांचे म्हणणं ऐका. त्यांची तक्रार दाखल करून घ्या. अशी मागणी राहुल गांधी यांनी पोलिसांना केली. पोलिसांकडून पॅलेट गन कारवाईची कोणतीही ठोस माहिती दिली जात नाही. त्यामुळे नेमका तपास कुठपर्यंत आलाय हे कळायला मार्ग नसल्याने राहुल गांधी ही माहिती घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

# सीजेपीच्या आशुतोष रांका यांना मारहाण

जयपूर (वृत्तसंस्था)

राजस्थानमध्ये 'कॉकरोच जनता पार्टी' च्या शाळा भेटींना विरोध सुरू झाला आहे. शुक्रवारी सकाळी जयपूरमधील बगरू येथील रामपुरा कंवरपुरा येथील सरकारी प्राथमिक शाळेची पाहणी करण्यासाठी आलेले सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रांका व त्यांच्या सहकाऱ्यांना गावकऱ्यांनी मारहाण करून अक्षरशः पिटाळून लावले. त्यांच्यावर दगडफेकही करण्यात आली.

सीजेपीने जयपूरमधील दोन सरकारी शाळांना भेट देण्याचे नियोजन केले होते. या नियोजनाचा भाग म्हणून, सीजेपी चे काही कार्यकर्ते रामपुरा कंवरपुरा येथे पोहोचले. इमारतीची दुरवस्था झाल्यामुळे तेथील शाळा बंद करण्यात आली होती. तेथील विद्यार्थ्यांना जवळच असलेल्या एका शेडमध्ये शिकवले जात होते.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिकांनी आधी सीजेपी कार्यकर्त्यांना बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी सरकारी शाळेबाहेर निदर्शने केली, सीजेपी विरोधात घोषणाबाजी केली आणि ट्रॅक्टर-ट्रॉली आडवी लावून गावाचा मुख्य रस्ता रोखून धरला.

# शिवदुर्गा संवादातून महिलांच्या समस्या जाणून घेणार

## आमदार मनीषा कायंदे; महिला पदाधिकाऱ्यांशी संवाद



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शिवसेनेशी जोडलेल्या महिलांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी, समस्या आणि अपेक्षा जाणून घेण्याबरोबरच शिवसेना संघटनेत महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर भर दिला जाणार आहे अशी माहिती शिवसेना आ. मनीषा कायंदे यांनी दिली.

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महिला शिवसेना आघाडीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात 'शिवदुर्गा संवाद दौरा' सुरू करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर व अकोले तालुक्यातील शिवसेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांची बैठक आ. अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात घेण्यात आली. आ. मनीषा कायंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत महिला पदाधिकाऱ्यांशी विविध विषयांवर संवाद साधण्यात आला. यावेळी आमदार अमोल खताळ, शिवसेना उपनेत्या सुवर्णा करंजे, उपनेत्या सरिता माळी, जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, नितीन अवताडे, महिला जिल्हा संपर्कप्रमुख सुरेखा गव्हाणे, जिल्हाप्रमुख सुनीता शेळके, आदिशक्ती फाउंडेशनच्या प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ, दिपाली वाव्हळ, संगीता बांबळे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, शिवाज्ञा आरगडे यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

आमदार कायंदे म्हणाल्या, शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी महिलांचा 'रणरागिणी' म्हणून कायम सन्मान केला. त्याच परंपरेला पुढे नेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण भागातील अनेक महिला शिवसेनेशी जोडल्या गेल्या आहेत. या महिलांच्या अडचणी काय आहेत, त्यांच्या अपेक्षा काय आहेत आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या सूचना काय आहेत हे जाणून घेण्यासाठी 'शिवदुर्गा संवाद दौरा' आयोजित करण्यात आला आहे.

हा संवाद दौरा टप्प्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणार असून, त्यासाठी तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांतील महिलांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या जातील. महिलांना पक्ष संघटनेत अधिकाधिक संधी देण्याबरोबरच त्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या दौऱ्याच्या माध्यमातून केला जाणार आहे.

बैठकीत महिला पदाधिकाऱ्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त केले. महिलांवर कोणताही प्रसंग किंवा संकट आले, तर आमदार खताळ हे तत्काळ दूरध्वनीवर प्रतिसाद देऊन मदतीसाठी पुढाकार घेतात, असे महिला पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# विठोबा गणपत आभाळे गुरूजींचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी) -

अकोले - सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व 'कथा निळवंडे धरणाची' पुस्तकाचे या लेखक विठोबा गणपत आभाळे (वय ९५ मूळ गाव निळवंडे, ता. अकोले) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. बाजार समितीचे निवृत्त सचिव अरुण आभाळे, निळवंडेचे माजी उपसरपंच प्रमोद आभाळे, टिळकनगर ज्युनिअर कॉलेज डोंबिवली पूर्व येथील प्रा. विनायक आभाळे, नंदा भास्कर मालुंजकर व मंदा भाऊसाहेब लोहोटे यांचे ते वडील होत.

माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांचे ते खंदे समर्थक होते. निळवंडे धरण व प्रकल्पग्रस्त यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. दैनिक युवावार्ता परिवारच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# नव्या रस्त्यावर ओव्हरलोड डंपरची वाहतूक

## रस्ते खराब, ग्रामस्थांचा संताप




युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव -अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या पाठपुराव्यातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कुरकुंडी-सांगडेवाडी ते भोजदरी रस्त्याची दर्जोन्नती करण्यात आली आहे. या रस्त्यावरून सध्या खडी व क्रश सॅण्डची वाहतूक करणारे ओव्हरलोड डंपर सुरू झाल्याने कुरकुंडी ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

कुरकुंडी-सांगडेवाडी ते भोजदरी रस्ता ४.६०० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या जॉनतीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ५२१.५६ लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन हे काम पूर्ण करण्यात आले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारामार्फत १० वर्षे देखभाल व दुरुस्तीची हमी

देण्यात आली आहे. पुणे येथील एका संस्थेमार्फत काम करण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अहिल्यानगर ही कार्यकारी यंत्रणा आहे. मात्र, सांगडेवाडी परिसरात खडी क्रेशर असल्याने तेथून खडी व क्रश सॅण्डची डंपरद्वारे वाहतूक केली जाते. पूर्वी ही वाहतूक सांगडेवाडी ते बोटा मार्गे केली जात होती. मात्र, सिमेंट कॉंक्रिटचा नवा रस्ता झाल्यानंतर डंपरचालकांकडून या मार्गावरून ओव्हरलोड वाहतूक सुरू झाल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यामुळे नव्याने झालेल्या रस्त्याचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, स्वातंत्र्यदिनी ग्रामस्थांनी चार ते पाच डंपर अडवून चालक व मालकांना रस्ता खराब होतो आहे, या मार्गावरून अवजड वाहतूक करू नका, अशी समज दिली होती. मात्र, मंगळवारी (दि.१८) पुन्हा डंपरची वाहतूक सुरू झाल्याने ग्रामस्थांनी एक डंपर पकडला. याबाबत घारगाव पोलीस व तलाठ्यांना माहिती देण्यात आली.

माहिती मिळूनही सुमारे एक तासानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. सहाय्यक फौजदार नारायण ढोकरे, कॉन्स्टेबल प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून डंपर सोडला. मात्र, वरिष्ठांचा फोन आल्यानंतर संबंधित डंपर पुन्हा घारगाव पोलीस ठाण्यात आणण्यात आला. घारगावचे तलाठी संदीप पवार यांनी पंचनामा केला आहे. नव्याने झालेल्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे आयुष्य टिकविण्यासाठी ओव्हरलोड व अवजड वाहतुकीवर प्रशासनाने तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी कुरकुंडी ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून संबंधित डंपरची तपासणी करावी, ओव्हरलोड वाहतुकीवर कारवाई करावी आणि रस्त्याचे नुकसान झाल्यास संबंधितांकडून नुकसानभरपाई वसूल करावी, अशी मागणी केली आहे. शासनाच्या निधीतून लाखो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेला रस्ता अवजड वाहतुकीमुळे अल्पावधीत खराब होऊ नये, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

# सावेडीत क्षुल्लक कारणातून पत्रकारास बेदम मारहाण

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- साम टीव्ही न्यूज वाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी सुशील थोरात यांच्यावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने क्षुल्लक कारणावरून बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना अहिल्यानगरमध्ये घडली. सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवर एचडीएफसी बँकेजवळ हा प्रकार घडला. या हल्ल्यानंतर थोरात यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच शहरातील पत्रकारांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. शहर विभागाचे उपअधीक्षक दिलीप टिपरसे आणि तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक

बालाजी वैद्य यांनी रुग्णालयात धाव घेत घटनेची माहिती घेतली. दरम्यान, मारहाण करणाऱ्या काही संशयितांची नावे पोलिसांना समजली आहेत. थोरात यांच्यावर झालेल्या या हल्ल्याचा पत्रकार संघटनांकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. शुक्रवारी पत्रकार

पदाधिकारी आणि सदस्य जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेऊन आरोपींवर कडक कारवाईची मागणी करणार आहेत. विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकत्यांनीही या घटनेचा निषेध नोंदवत शहरातील वाढत्या गुंडगिरीवर पोलिसांनी जरब बसवावी, अशी मागणी केली आहे.

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
TANESH AMRIKLAL PANJABI
NEW NAME AS
TANESH AMREKLAL PAPDEJA
Address- indiranagar galli no 1SANGAMNER 422605

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# संगमनेरात 'मनःशांती' आणि 'जीवनविकास' व्याख्यानमाला

## राजस्थान युवक मंडळाचे आयोजन; चार दिवस चालणार उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रावण मासाचे औचित्य साधून राजस्थान युवक मंडळाच्या वतीने २२ ते २५ ऑगस्टदरम्यान चार दिवसीय 'मन:शांती आणि जीवनविकास' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली. संगमनेरकरांनी या व्याख्यानमालेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी आणि कार्याध्यक्ष सागर मणियार यांनी केले आहे.

शनिवार, २२ आणि रविवार २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते ९.०० या वेळेत महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार आणि समाजप्रबोधनकार ह.भ.प.रोहिणीताई परांजपे यांचे सुमधुर प्रवचन होणार आहे. सोमवार, २४ आणि मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी प्रेरक व्याख्याते आणि गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ.संजय मालपाणी हे ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील तिसर्या आणि चौथ्या अध्यायाचे आपल्या रसाळ शैलीत निरुपण करणार आहेत.

'ज्ञानेश्वरी भावयात्रा' हा त्यांचा लोकप्रिय कार्यक्रम मागील वर्षीही श्रावण महिन्यात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या पहिल्या आणि दुसर्या अध्यायांवर आधारित भावार्थ सादर केला होता. त्या कार्यक्रमाला हजारो श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. ही व्याख्यानमाला मालपाणी लॉन्स येथील उत्सव सभागृहात होणार असून श्रोत्यांसाठी खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. नागरिकांनी चारही दिवस सहकुटुंब उपस्थित राहून या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, सचिव कृष्णा आसावा, खजिनदार वेणुगोपाल कलंत्री, सहसचिव दर्शन भंडारी, सहखजिनदार सीए शुभम राठी, तसेच कार्यकारिणी सदस्य गिरीश मालपाणी, मधुसूदन नावंदर, राजकुमार बिहाणी, मनीष मणियार, नितीन लाहोटी, आशिष राठी, सुमित अट्टल, गौरव राठी, सचिन पलोड, प्रतीक पोफळे, ओंकार इंदाणी, पवन करवा, उमेश कासट, कल्याण कासट, गणेश लाहोटी, रोहित मणियार, सम्राट भंडारी, व्यंकटेश लाहोटी, प्रथम खटोड, सिद्धांत झंवर आणि शुभम आसावा आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# धनश्री काकड यांची आयआयएम बोधगया येथे स्टाफ नर्सपदी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - तळेगाव येथील धनश्री नानासाहेब काकड यांची भारतीय व्यवस्थापन संस्था, बोधगया (खखच् ड्ढेवह त्र्क्रूर) येथे स्टाफ नर्स पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

धनश्री काकड यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. प्रतिष्ठित भारतीय व्यवस्थापन संस्था, बोधगया येथे स्टाफ नर्स पदावर काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक कारकिर्दीत महत्त्वाची भर पडली आहे.

धनश्री यांचे वडील नानासाहेब काकड हे तळेगाव येथे एका खासगी कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही मुलीच्या शिक्षणाला आणि करिअरला प्रोत्साहन देत त्यांनी केलेल्या पाठिंब्यामुळे धनश्री यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशामुळे काकड कुटुंबीयांसाठी हा क्षण अभिमानाचा ठरला आहे. धनश्री काकड यांच्या निवडीबद्दल परिसरातील नागरिक, मित्रपरिवार व हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशामुळे मेहनत, सातत्य आणि योग्य संधी यांच्या जोरावर ग्रामीण व सामान्य कुटुंबातील तरुण-तरुणींनाही प्रतिष्ठित संस्थांमध्ये आपले स्थान निर्माण करता येते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# सोने- चांदीच्या दरात मोठी उसळी



मुंबई (वृत्तसंस्था)

सलग दुसऱ्या दिवशी सोने चांदी दरात पुन्हा मोठी वाढ झाल्याचं चित्र आहे. सोन्याच्या दरात गेल्या चोवीस तासात २५००ची वाढ होऊन काल (गुरूवारी, ता २०) १५६००० रुपये असलेले सोन्याचे दर आज (शुक्रवारी, ता २१) १५८५०० वर जाऊन पोहोचले आहेत. तर चांदीच्या दरात ही ८००० हजार रुपयांची वाढ होऊन काल (गुरूवारी, ता २०) असलेले २४०००० दर आज (शुक्रवारी, ता २१) २४८००० वर जाऊन पोहोचले आहेत. दोन्ही दर जीएसटी शिवायचे आहेत. डॉलर इंडेक्समध्ये झालेली घसरण आणि अमेरिकन फेडरल बँकांत व्याज दरात वाढ न होण्याचे संकेत याचा एकत्रित परिणाम सोन्याच्या गुंतवणुकीत वाढ होऊन, सोने चांदीच्या दरात वाढ होत असल्याचं सांगितले जात आहे. जागतिक बाजारात देखील सोने आणि चांदीच्या दरात पुन्हा एकदा मोठी तेजी पाहायला मिळत आहे. २१ ऑगस्ट रोजी सकाळीच सोने आणि चांदीच्या दरात मोठी उसळी दिसून आल्याने ग्राहकांना धक्का बसला आहे. २४ कॅरट सोन्याच्या दरात ४३०० रुपयांची वाढ झाली असून ते १ लाख ६२ हजार रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचले आहे. तर दुसरीकडे, चांदीच्या दरात एकाच दिवसात तब्बल १०००० रुपयांची तुफान वाढ झाली आहे.

# जिल्ह्यातील धरणांत ९१ टक्के पाणीसाठा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - गेल्या वीस दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दडी मारली. ६३ टक्के तुटीच्या पावसामुळे खरीप पिके धोक्यात आली. अशा परिस्थितीत भंडारदरा, मुळा, निळवंडेसह नऊ धरणांत २१.२३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने लाभक्षेत्रात जनतेला किंचितसा दिलासा मिळाला आहे. जुलै महिना सोडला तर उर्वरित दीड महिन्यांत तुटीच्या पावसाची नोंद आहे. जुलै महिन्यात धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्यामुळे भंडारदरा, निळवंडे धरणे ओव्हरफ्लो झाली. मुळा धरण ९५ टक्के भरले. आढळादेखील भरले असून, विसापूर ७६ टक्के तर सीना ३३ टक्के भरले. त्यामुळे आतापर्यंत जिल्हाभरातील धरणांत ४६ हजार ६२९ दलघफू इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ४५ हजार ९०० दलघफू इतका पाणीसाठा उपलब्ध होता. यंदा पावसाने अधिक ओढ दिल्यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. पिके वाचविण्यासाठी धरणांतून आवर्तन सोडण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होण्याची शक्यता वाढली आहे

# कुत्र्यांनी घेतला पाच मेंढ्यांचा बळी

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील पिंप्री लौकी परिसरात बिबट्याची दहशत असतानाच दुसरीकडे मोकाट कुत्र्यांचा आणि रानडुकरांचा मोठा उपद्रव वाढला असून, शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात एका मेंढपाळाच्या पाच मेंढ्या ठार झाल्या असून, रानडुकरांनी उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याचेही दिसले.

पिंप्री लौकी येथील शेतकरी व मेंढपाळ पोपटराव दातीर यांच्या मेंढ्यांवर १० ते १५ मोकाट कुत्र्यांनी हल्ला चढवला, त्यात पाच मेंढ्या जागीच ठार झाल्या, तर चार मेंढ्या गंभीर जखमी झाल्या. यामुळे दातीर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. परिसरात आधीच बिबट्याची दहशत असताना आता मोकाट कुत्र्यांमुळे नागरिक, विशेषतः शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कुत्र्यांच्या दहशतीसोबतच रानडुकरांनीही शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पोनाडी रोड ते दरा, पिंपरी फाटा आणि गीते वस्ती परिसरात गेल्या महिनाभरापासून रानडुकरांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या वेळी ही डुकरे शेतात घुसून ऊस आणि मका पिके उद्ध्वस्त करत आहेत. एकाच रात्रीत मोठे क्षेत्र फस्त केले जात असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या सामाजिक कार्यकर्ते भारतराव पाटील गिते यांनी पशुसंवर्धन आणि वनविभागाला या घटनेची माहिती दिली असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, सरपंच संगीता गिते व उपसरपंच बाजीराव गिते यांनी थेट पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्राद्वारे साकडे घातले आहे.

# मुंबईतील शाळांच्या कॅंटीनमध्ये जंक फूडला लगाम

## वडापाव-समोसाऐवजी पोहे, उपमा व ताक



मुंबई : विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत मुंबईतील शाळांच्या कॅंटीनमधील खाद्यपदार्थांच्या मेन्यूमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. वडापाव, समोसा, कोल्ड्रिंक यांसारख्या जंक फूडला आळा घालत आता पोहे, इडली, शिरा, डोसा, उपमा आणि ताक यांसारख्या पौष्टिक पदार्थांना पसंती देण्यात आली आहे.

शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांना कॅलरी, साखर आणि चरबीचे प्रमाण अधिक असलेले पदार्थ सहज उपलब्ध होऊ नयेत, यासाठी नियमांची काटेकोर अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. शाळेच्या ५० मीटर परिसरात जंक फूड आणि तत्सम शीतपेयांची विक्री करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या नियमांच्या अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी अन्न मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित अन्नाबाबतचा हा नियम २०२० पासून अस्तित्वात असून, आता त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे.

मुंबई महापालिकेच्या अखत्यारितील शाळांनी या निर्देशांची अंमलबजावणी करत कॅंटीनचा मेन्यू बदलण्यास सुरुवात केली आहे. जंक फूडच्या ऐवजी पौष्टिक आणि पारंपरिक पदार्थांचा समावेश करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या आहाराच्या सवयींमध्येही सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तुकाराम मुंढे यांनी सोमवारी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण आयुक्तांची भेट घेऊन या आदेशाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. आठवडाभरात नियमांची अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. तसेच मुख्याध्यापक, प्राचार्य आणि अन्न समितीच्या प्रमुखांनी याबाबत विशेष जनजागृती कार्यक्रम घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

दरम्यान, शाळांच्या कॅंटीनमध्ये वडापाव-समोसाची जागा पोहे, इडली, उपमा आणि ताकाने घेतल्याने 'जंक फूडला ब्रेक, हेल्दी फूडला प्रोत्साहन' असा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने या निर्णयाचे पालकांकडूनही स्वागत होण्याची शक्यता आहे.

# मंगळेश्वर विद्यालयाचे २५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र, ४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत



ओवी सावंत ( 242 गुण ) | तेजस्विनी भोकनळ ( 230 गुण ) | श्रेयस हासे ( 230 गुण ) | हर्षवर्धन वाळे ( 200 गुण )

युवावार्ता (प्रतिनिधी)

येथील मंगळेश्वर विद्यालयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले असून, विद्यालयातील इ. ५ वीचे १६ विद्यार्थी, इ.७ वी चे ६ विद्यार्थी तसेच ८ वी चे ३ विद्यार्थी असे एकुण २५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले.

या पात्र विद्यार्थ्यांमधून इ.५ वीतुन ओवी सावंत (२४२ गुण) व श्रेयस हासे (२३० गुण) यांची तसेच इ. ७ वीतुन तेजस्विनी भोकनळ (२३० गुण), इ.८ वी च्या हर्षवर्धन वाळे (२०० गुण), या चार विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीच्या जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. या स्पर्धा परीक्षेतील यशामुळे राजापूर केंद्रात मंगळेश्वर विद्यालयाला प्रथम स्थान मिळाले.

त्यानिमित्ताने शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे, तसेच मार्गदर्शन करणारे कांबळे पी. जी., जाधव. जी. आर., वाकचौरे बी. डी., पावसे, जे. यु., वाळे व्ही. एस., खेमनर एल.सी., मेंगाळ एस.एस., वाकचौरे, एन.आर., या सर्वांचे, जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, तसेच संस्थेचे रजिस्ट्रार एम. एम. फटांगरे, व विद्यालयाचे मुख्याध्यापक कढणे एस. व्ही, जेष्ठ शिक्षक राहाणे एस.एम, पवार डी.एस तसेच मंगळापूर गावातील सरपंच, उपसरपंच, सर्व संस्थेचे पदाधिकारी, पालक वर्गांनी अभिनंदन केले असून, यामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधिक दृढ होत आहे.


चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382


# भारतरत्न स्व. राजीव गांधी हे विज्ञान व तंत्रज्ञान क्रांतीचे जनक - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- : एकविसाव्या शतकासाठी विकास आणि आधुनिकतेचा पाया घालणारे भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी हे भारतातील माहिती व तंत्रज्ञान क्रांतीचे जनक होते, असे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी काढले.

राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त २० ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील वीरभूमी येथे त्यांच्या स्मृतिस्थळावर बाळासाहेब थोरात यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, खासदार सोनिया गांधी, खासदार प्रियंका गांधी, अशोक गेहलोत, सचिन पायलट, शशी थरूर यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते उपस्थित होते.

यावेळी बोलताना थोरात म्हणाले की, काँग्रेस पक्षाला त्याग आणि बलिदानाची मोठी परंपरा आहे. इंदिराजी गांधी आणि राजीव गांधी यांनी देशाच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी बलिदान दिले. काँग्रेसने कायम लोकशाही, राज्यघटना आणि गोरगरीबांच्या विकासाचा विचार जपला आहे. मात्र सध्या देशात लोकशाही व राज्यघटना धोक्यात असून जातीभेदाचे राजकारण वाढणे ही चिंतेची बाब आहे. तरुणांनी देशाची लोकशाही आणि आपले भविष्य वाचवण्यासाठी एकत्र येऊन लढले पाहिजे.

राजीव गांधी यांनी भारतात माहिती तंत्रज्ञान क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. संगणक आणि दूरसंचार क्षेत्राला चालना देण्याबरोबरच पंचायत राज व्यवस्था बळकट केली आणि युवकांना वयाच्या १८व्या वर्षी मतदानाचा अधिकार दिला. आधुनिक भारताच्या उभारणीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण केल्या. विकसित भारताचे स्वप्न पाहणाऱ्या राजीव गांधी यांचे देशाच्या एकात्मतेसाठीचे बलिदान प्रत्येक भारतीयाच्या मनात सदैव राहील, असे थोरात यांनी सांगितले.

## संपादकीय...

# फेक न्यूजचा विळखा समाजासमोरील नवे संकट

आजच्या डिजिटल युगात माहिती मिळवणे पूर्वीपेक्षा अत्यंत सोपे झाले आहे. मोबाईल हातात आला की देश-विदेशातील कोणतीही बातमी काही क्षणांत आपल्यापर्यंत पोहोचते. सोशल मीडिया, व्हॉट्सप, फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब यांसारख्या माध्यमांनी माहितीची देवाणघेवाण वेगवान केली आहे. मात्र या वेगासोबतच एक गंभीर समस्या समाजासमोर उभी राहिली आहे-फेक न्यूज अर्थात खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती. बातमी खरी आहे की खोटी, याची खात्री न करता ती पुढे पाठवण्याची सवय समाजासाठी धोकादायक ठरू लागली आहे. एखाद्या व्यक्तीविषयी चुकीची माहिती, एखाद्या घटनेचा खोटा संदर्भ, जुना फोटो नव्या घटनेशी जोडणे, बनावट व्हिडिओ तयार करणे किंवा एखाद्या वक्तव्याचा विपर्यास करणे, या माध्यमातून फेक न्यूज पसरवली जाते. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे बनावट फोटो, आवाज आणि व्हिडिओ तयार करणेही सोपे झाले आहे. त्यामुळे सत्य आणि असत्य यातील फरक ओळखणे अधिक कठीण झाले आहे. फेक न्यूजचा सर्वात मोठा परिणाम सामाजिक विश्वासावर होतो. समाजात एखाद्या समुदायाविषयी, व्यक्तीविषयी किंवा संस्थेविषयी खोटी माहिती पसरली तर गैरसमज निर्माण होतात. काही वेळा अफवांमुळे तणाव वाढतो, वाद निर्माण होतात आणि कायदा-सुव्यवस्थेची परिस्थितीही गंभीर होऊ शकते. एखाद्या घटनेची अपुरी किंवा चुकीची माहिती मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्यास त्याचे परिणाम प्रत्यक्ष समाजजीवनावर दिसून येतात. फेक न्यूजचा धोका केवळ सामाजिक क्षेत्रापुरता मर्यादित नाही. राजकारणातही चुकीची माहिती जनमतावर प्रभाव टाकू शकते. निवडणुकीच्या काळात एखाद्या उमेदवाराविषयी खोटी माहिती पसरवणे, बनावट सर्वेक्षणे किंवा खोटे दावे व्हायरल करणे यामुळे मतदारांची दिशाभूल होऊ शकते. लोकशाहीमध्ये नागरिकांचा निर्णय हा योग्य आणि विश्वासार्ह माहितीवर आधारित असणे आवश्यक आहे. माहितीच चुकीची असेल तर लोकशाही प्रक्रियेवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. आर्थिक क्षेत्रातही फेक न्यूजचे गंभीर परिणाम होऊ शकतात. एखाद्या कंपनीविषयी खोटी बातमी, बँक बंद होणार असल्याची अफवा, एखाद्या उत्पादनाबाबत चुकीची माहिती किंवा शेअर बाजाराशी संबंधित बनावट संदेश यामुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. घाईघाईने आलेल्या संदेशांवर विश्वास ठेवून आर्थिक व्यवहार करणे अनेकदा फसवणुकीचे कारण ठरते. आरोग्यविषयक चुकीची माहिती हा आणखी गंभीर विषय आहे. सोशल मीडियावर एखादा घरगुती उपाय, औषध किंवा उपचार पद्धती सर्व रोगांवर प्रभावी असल्याचा दावा केला जातो. अशा माहितीवर वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला न घेता विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आरोग्यविषयक माहिती नेहमी अधिकृत आणि विश्वासार्ह स्रोतांकडूनच घेणे आवश्यक आहे. फेक न्यूजच्या प्रसारामध्ये केवळ ती तयार करणारे लोकच जबाबदार नसतात. ती विचार न करता पुढे पाठवणारा प्रत्येक व्यक्तीही तिच्या प्रसाराचा भाग बनतो. व्हॉट्सपवर आलेला संदेश खरा आहे का, याचा विचार न करता 'फॉरवर्ड' करण्याची सवय बदलण्याची गरज आहे. 'मला आले आहे म्हणजे ते खरेच असेल' हा समज अत्यंत चुकीचा आहे. बातमी वाचताना काही साध्या गोष्टींची काळजी घेतली तरी फेक न्यूजपासून मोठ्या प्रमाणावर बचाव करता येतो. बातमी कोणत्या माध्यमातून आली आहे, तिची तारीख काय आहे, बातमीचे मूळ स्रोत कोणते आहेत, इतर विश्वासार्ह माध्यमांनीही ती बातमी दिली आहे का, याची तपासणी करणे आवश्यक आहे. फोटो किंवा व्हिडिओ जुना आहे का, त्याचा संदर्भ बदलला आहे का, हेही पाहणे महत्त्वाचे आहे. विशेषतः अतिशय धक्कादायक, भावनिक किंवा संताप निर्माण करणारे संदेश दिसले की ते तातडीने पुढे न पाठवता आधी त्याची सत्यता तपासली पाहिजे. याठिकाणी विश्वासार्ह पत्रकारिता आणि जबाबदार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी तथ्य पडताळणी करणे, अधिकृत स्रोत तपासणे, अफवांना प्रसिद्धी न देणे आणि चुकीची माहिती आढळल्यास ती दुरुस्त करणे, ही माध्यमांची जबाबदारी आहे. पत्रकारितेचा वेग महत्त्वाचा असला तरी सत्यापेक्षा वेग मोठा असू शकत नाही. 'पहिली बातमी' देण्याच्या स्पर्धेपेक्षा 'विश्वासार्ह बातमी' देण्याला प्राधान्य मिळाले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्येही मीडिया आणि डिजिटल साक्षरतेचे शिक्षण देण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना माहिती शोधणे, स्रोत तपासणे, फोटो-व्हिडिओची सत्यता पडताळणे आणि डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे शिकवले पाहिजे. आजची मुले उद्याचे माहितीविश्व घडवणार आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये चिकित्सक विचार करण्याची सवय निर्माण करणे ही काळाची गरज आहे. फेक न्यूजला आळा घालण्याची जबाबदारी सरकार, माध्यमे किंवा सोशल मीडिया कंपन्यांचीच नाही. ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण एखादी खोटी माहिती पुढे पाठवली नाही, एवढे जरी केले तरी फेक न्यूजच्या प्रसाराची एक साखळी आपण तोडू शकतो..

# अमृतेश्वर मंदिरात दीपोत्सवाने रंगला हरिनाम सप्ताह



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची परंपरा असून विविध जाती धर्मातील संतांनी प्रेमाचा व समतेचा संदेश सर्वांना दिला आहे. ज्ञानेश्वरी पारायण हा अमृता अनुभव असून ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरी हे महाकाव्य संपूर्ण विश्वाला दिशादर्शक असल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. कांचनताई थोरात यांनी म्हटले आहे तर ज्ञानेश्वरी हे महाकाव्य जगाला दिशा देणारे असल्याचे सौ दुर्गाताई तांबे यांनी म्हटले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथील अमृतेश्वर मंदिरात ४१ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या दीपोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कांचनताई थोरात, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पा. घुले, ह.भ.प गोविंद महाराज करंजकर, ह. भ. प. चंद्रलेखाताई काकडे, संचालक सौ.लताताई गायकर, अॅड. बाबासाहेब गायकर, अॅड. अशोक हजारे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे, कृष्णा दिघे,कार्याध्यक्ष रामदास तांबडे, ह.भ.प.अरुण जोंधळे, संदीप दिघे, राजू बड यांच्यासह अमृत सांस्कृतिक मंडळाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी सौ. कांचनताई थोरात म्हणाल्या की, अमृतेश्वर मंदिरातील या सप्ताहाला मोठी समृद्ध परंपरा आहे. स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, ह. भ. प. गावडे महाराज व कलामाई यांच्या प्रेरणेतून हा सप्ताह मागील ४१ वर्षांपासून सुरू आहे.ज्ञानेश्वरी गाथा पारायण यावर्षी ४०० महिलांचा सहभाग असून ज्ञानेश्वरी पारायण हा जीवनातील अमृत अनुभव आहे. प्रत्येकाने एक तरी ओवी अनुभवावी असे सांगताना वारकरी संप्रदायाला मोठी परंपरा आहे. पंढरपूरचा पांडुरंग हे आराध्य दैवत म्हणून विविध जाती धर्मातील सर्व संतांनी समतेचा बंधुतेचा व प्रेमाचा संदेश दिला आहे. द्वेषला कुठेही थारा नाही. हा समतेचा बंधू भावाचा मंत्र आपल्याला जपायचा आहे. महाकवी संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी प्राकृत भाषेत आपल्याला दिली विश्वाच्या कल्याणासाठी त्यांनी विचार आपल्याला दिले.

सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, ज्ञानेश्वरी हे महाकाव्य मानवतेच्या कल्याणासाठी आहे. थोरात परिवाराला वारकरी संप्रदायाचा मोठा वारसा आहे. मंजुळाताई थोरात या आमच्या आजी यांनी आम्हा सर्वांना पूजेपासून सर्व गोष्टी शिकविल्या वहिनी सौ.कांचनताई थोरात या अत्यंत धार्मिक व मनमिळावू आहेत. त्या कधीही पूजा केल्याशिवाय बाहेर पडत नाही. दररोज एक तरी ज्ञानेश्वरी ची ओवी वाचतात. तर कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू असून महिलांची मोठी उपस्थिती आणि ज्ञानेश्वरी पारायण हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य राहिले आहे. दीपोत्सव हा आनंदाचा क्षण असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले.

# मालपाणी विद्यालयात ९३५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी यांच्या वतीने ९३५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत नियमित आरोग्य तपासणीच्या माध्यमातून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

या आरोग्य तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने डॉ. मार्गेपवार, डॉ. काळे, सहाय्यक तळपाडे व वर्पे मॅडम यांचे वैद्यकीय पथक उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी वैद्यकीय पथकाचे स्वागत केले. या वेळी ९३५ विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना यापूर्वी झालेल्या आजारांची व आरोग्यविषयक समस्यांची माहिती घेण्यात आली. तपासणीदरम्यान आढळून आलेल्या आरोग्यविषयक समस्यांनुसार संबंधित विद्यार्थ्यांना पुढील उपचार व आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शनासाठी ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी येथे पाठविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे, त्यांच्या आरोग्यविषयक समस्या वेळेत निदर्शनास याव्यात आणि त्यावर योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी उपक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या आरोग्य तपासणीचे नियोजन विनायक हिरे, अंबादास बुलाखे, आप्पासाहेब मिंडे व नंदकुमार डाके यांनी केले.

# आदिवासी गुणवंत विद्यार्थ्यांचा रविवारी राजूर येथे सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र, पुणे आणि आदिवासी स्वप्नदूत फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यातील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ रविवारी, २३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राजूर येथील अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी) तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान) मध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या, तसेच व्यावसायिक व पदवी अभ्यासक्रमांमध्ये विशेष प्रावीण्य संपादन करणाऱ्या अकोले तालुक्यातील गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी मा. वाहरू दादा सोनवणे भूषविणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून कवी दंगलकार मा. नितीन चंदनशिवे उपस्थित राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे, राजूर प्रकल्प अधिकारी श्रीमती देवकन्या बोकडे आणि प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देणे, त्यांच्या यशाचा गौरव करणे आणि इतर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या सत्कार समारंभास अकोले तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आदिवासी समाज कृती समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष इंजि. नामदेव गंभिरे तसेच आदिवासी स्वप्नदूत फाउंडेशन, मुंबईचे इंजि. सुनील भांगरे यांनी केले आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'म्युझियम ऑन व्हील्स' द्वारे सिंधू-सरस्वती संस्कृतीचा परिचय



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (उडचतड), मुंबई यांच्या सहकार्याने 'म्युझियम ऑन व्हील्स' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सिंधू-सरस्वती अर्थात हडप्पा संस्कृतीच्या गौरवशाली वारशाची प्रत्यक्ष अनुभूती घेण्याची संधी मिळाली.

वर्गातील शिक्षणाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. फिरत्या संग्रहालयात प्राचीन संस्कृतीतील कला, स्थापत्यकला, जीवनशैली, हस्तकला, विविध साधने, मृद्भांडी तसेच पुरातत्त्वीय अवशेष आणि त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करण्यात आल्या. हडप्पा व मोहेंजोदडो यांसारख्या महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय स्थळांची तसेच त्या काळातील नगररचना व जीवनपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबईच्या प्रतिनिधींनी माहितीपूर्ण व संवादात्मक सत्र घेतले. तज्ज्ञांनी सिंधू-सरस्वती संस्कृतीचा विकास, तिचे ऐतिहासिक महत्त्व, नगररचना, कला व संस्कृती याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुरातत्त्वीय अवशेषांच्या आधारे इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ प्राचीन संस्कृतीचा इतिहास कसा उलगडतात, याची माहितीही देण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी 'म्युझियम ऑन व्हील्स'ला भेट देऊन विविध वस्तू, प्रतिकृती आणि प्रदर्शने उत्सुकतेने पाहिली. पाठ्यपुस्तकांमध्ये शिकलेला इतिहास प्रत्यक्ष वस्तू व दृश्य माध्यमांतून अनुभवता आल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह आणि जिज्ञासा वाढली. भारताच्या समृद्ध पुरातत्त्वीय व सांस्कृतिक वारशाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली.

या उपक्रमामुळे सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव यांची सांगड घालत विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षणाची संधी मिळाली. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अॅडमिशन काउन्सेलर कल्पेश वानखेडे यांनी विशेष प्रयत्न करून समन्वय साधला. शाळेच्या प्राचार्या श्रीमती मीनाक्षी मिश्रा यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला. या अभिनव उपक्रमाचे पालक आणि विद्यार्थ्यांनी कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक आनंददायी, परिणामकारक आणि संस्मरणीय होत असल्याचे पालकांनी नमूद केले. 'म्युझियम ऑन व्हील्स'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारताच्या प्राचीन वारशाची ओळख करून देतानाच सांस्कृतिक वारशाच्या जतनाची जाणीवही निर्माण झाली.


SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

**पाहिजेत**

सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर

ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा

स्क्रिन प्रिटींग – २ जागा

टेलीकॉलर – २ (महिला)

– संपर्क –

९८२२४५३०३६

**JOB**

SR THORAT — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी

अकाऊंटंट - 2 जागा

पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक

कामाचा अनुभव आवश्यक

८९९९८६२७५९

**पाहिजेत**

डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –

डायलिसिस टेक्निशियन -२

कॅथलॅब टेक्निशियन - १

नर्सिंग सुपरवाईझर -१

कुटे हॉस्पिटल

ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

8888882225
9766855593

नेवासकर ऑटोमोबाईल्स

**पाहिजेत**

सर्व्हीस सुपरव्हायझर २ जागा

संगमनेर

8793223344
8446300400

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

– संपर्क –

8788945208
8208223721

# तणनाशक फवारल्याने वांग्याचे पीक उध्वस्त

## शेतकऱ्याचे दीड लाखांचे नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - कुरकुटवाडी शिवारातील शेतकरी शांताराम सावळेराम शिंदे यांनी २८ मार्च रोजी २२ गुंठे क्षेत्रात वांग्याची लागवड केली होती. मात्र, कोणीतरी शेतात तणनाशक फवारल्याने वांग्याचे पीक उध्वस्त झाल्याचे शिंदे यांनी घारगाव पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

वांग्याच्या लागवडीसाठी नांगरणी, मल्चिंग, रोटर, बेड तयार करणे, ठिबक सिंचन, रोपे, फवारणी आदींसाठी आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपये खर्च झाल्याचे शिंदे यांनी सांगितले. लागवडीनंतर सुमारे ४० दिवसांनी वांग्याचे उत्पादन सुरू झाले होते. त्यानंतर दर चार दिवसांनी एक ते दीड टन वांगी निघत होती.

शिंदे नारायणगाव बाजारपेठेत वांग्याची विक्री करीत होते. सध्या वांग्याला सुमारे ४० रुपये किलोचा दर मिळत असल्याने वर्षभराच्या उत्पादनातून सुमारे १० लाख रुपये उत्पन्न मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, पीक ऐन उत्पादनात असतानाच खराब झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, वांग्याच्या पिकाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. तपासणी अहवालात पिकावर तणनाशकाचा अंश आढळल्याचे नमूद असल्याचे शिंदे यांचे म्हणणे आहे. कोणीतरी तणनाशक फवरल्याने आपले पीक उध्वस्त झाले असल्याचे शिंदे यांनी फिर्यादीत म्हटले असून, याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# जिल्हाभर गुटखा-मावा विक्रेत्यांवर धडक कारवाई

## ४१ गुन्हे, ५८ आरोपी गजाआड



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अवैध गुटखा, मावा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले असून, अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने जिल्हाभरात धडक कारवाई करत अवैध तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रेत्यांना जोरदार दणका दिला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या विशेष आदेशानुसार राबविण्यात आलेल्या या मोहिमेत तब्बल ९४ लाख ६८ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ५८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जिल्ह्यात गुटखा, मावा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांचे जाळे उखडून काढण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तातडीने अधिकारी व अंमलदारांची विशेष पथके तयार करून जिल्ह्यातील अवैध साठेबाज व विक्रेत्यांची गुप्त माहिती संकलित करण्यास सुरुवात केली.

१५ जून ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत या पथकांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकत मोठ्या प्रमाणात अवैध तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या विशेष मोहिमेत एकूण ४१ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ५८ जणांना अटक करण्यात आली आहे.

या कारवाईत गुटखा, मावा, पानमसाला, सुगंधित तंबाखू तसेच इतर संबंधित अवैध मुद्देमाल असा एकूण ९४ लाख ६८ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात अवैध तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, अवैध गुटखा, मावा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. अशा प्रकारच्या अवैध धंद्यांविरोधात यापुढेही सातत्याने आणि अधिक तीव्र स्वरूपात कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा स्थानिक गुन्हे शाखेने दिला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

# राष्ट्र सेवा दलाच्यावतीने रविवारी अकोलेत दशरथ सावंत याचा सन्मान

अकोले (प्रतिनिधी)

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दीच्या निमित्ताने आणि बर विषमता निर्मूलन निर्धार वर्षाच्या औचित्याने अकोले तालुका राष्ट्र सेवा ३ दलाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी योद्धा दशरथ सावंत न यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' सन्मान व सोहळ्याला ज्येष्ठ शेतकरी नेते माजी खासदार राजू शेट्टी, साहित्यिक व माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख तसेच राष्ट्र सेवा दलाचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहाणार आहे.



रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी दु. २.३० वाजता अगस्ति महाविद्यालय अकोले येथील के. बी. दादा देशमुख सभागृहात हा सोहळा होणार आहे. महात्मा फुले यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन आणि वंचित समाजाच्या प्रश्नांना आपल्या विचाराच्या केंद्रस्थानी ठेवून अन्यायाविरुद्ध संघर्षाची वैचारिक मशाल पेटवली. त्याच परिवर्तनवादी विचार परंपरेचा जागर करत शेतकरी योद्धा दशरथ सावंत यांच्या शेतकरी-कष्टकरी समाजासाठीच्या कार्याचा 'शेतकऱ्यांचा आसूड' या गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सुशीलाताई दादासाहेब रूपवते उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. वैभव पिचड, ॲड. संघराज रूपवते, हिरालाल पगडाल, हेरंब कुलकर्णी, सुनील दातीर, विठ्ठल शेवाळे व सुधाकर देशमुख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी अकोले तालुका राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांच्यासह सदस्य परिश्रम घेत आहेत.

# दशक्रिया विधीसाठी आलेल्या महिलेचा विजेचा धक्का बसून मृत्यू

## धांदरफळमध्ये दुहेरी दुःखाचा डोंगर; परिसरात हळहळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -: तालुक्यातील धांदरफळ बु. येथे नातेवाईकांच्या दशक्रिया विधीसाठी आलेल्या ६० वर्षीय महिलेचा विद्युत तारेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी (दि. १८ ऑगस्ट) रात्री पावणेदहाच्या सुमारास घडली. एका दुःखद प्रसंगात सहभागी होण्यासाठी आलेल्या कुटुंबावरच आणखी एका आकस्मिक मृत्यूचे संकट ओढवल्याने धांदरफळसह प्रवरानगर परिसरात शोककळा पसरली आहे.

या घटनेत ललिता सुनील थेटे (रा. भगवतीपूर, प्रवरानगर) यांचा मृत्यू झाला. नातेवाईकांच्या दशक्रिया विधीसाठी मदत करण्याच्या उद्देशाने त्या गेल्या तीन-चार दिवसांपासून धांदरफळ येथे आल्या होत्या. दशक्रिया विधीच्या पूर्वतयारीतील कामांमध्ये त्यांनी दिवसभर नातेवाईकांना हातभार लावला. मात्र, रात्री घडलेल्या एका अनपेक्षित दुर्घटनेने आनंदी वातावरण क्षणातच शोकमग्न झाले. दशक्रिया विधीच्या आदल्या दिवशी रात्री नातेवाईक व पाहुणे मंडळी एकत्र बसली होती. त्यावेळी ललिता थेटे घराशेजारी असलेल्या कांद्याच्या चाळीचा लोखंडी दरवाजा लावण्यासाठी गेल्या. कुत्रे-मांजरी आत जाऊ नयेत, यासाठी त्या दरवाजा लावत असतानाच



बाजूला असलेली विद्युत तार लोखंडी कुंपणाच्या संपर्कात आली. परिसरात ओलावा असल्याने लोखंडी दरवाजाला विद्युत प्रवाह उतरला आणि थेटे यांना जोरदार विजेचा धक्का बसला.

विजेचा धक्का बसताच त्या जागेवरच कोसळल्या. घटना अवघ्या काही फुटांच्या अंतरावर घडल्याने नातेवाईकांनी तातडीने धाव घेतली. सुरुवातीला त्यांना साप किंवा अन्य प्राण्याने दंश केला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला. मात्र, प्रसंगावधान राखत नातेवाईकांनी लाकडाच्या सहाय्याने त्यांना विद्युत प्रवाहापासून बाजूला केले. त्यानंतर तातडीने वैद्यकीय मदत मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र काही मिनिटांतच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेनंतर ललिता थेटे यांना तातडीने घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर शवविच्छेदन करण्यात आले आणि मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

दुःखद प्रसंगातच आणखी एका आकस्मिक मृत्यूची भर पडल्याने थेटे कुटुंबीयांसह नातेवाईकांवर दुहेरी दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### दिनविशेष

१९७२: — वर्णद्वेषी धोरणाबद्दल झिम्बाब्वे ची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतुन हकालपट्टी करण्यात आली.
१९६२: — फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट फसला.
१९४४: — दुसरे महायुद्ध - सोविएत युनियनने रोमानिया जिंकले.
१९४२: — दुसरे महायुद्ध - ब्राझीलने जर्मनी इटालीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४१: — दुसरे महायुद्ध - जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.
१९०२: — कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना.
१८४८: — अमेरिकेने न्यू मेक्सिको हा प्रांत ताब्यात घेतला.
१६३९: — ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास (आताचेचेन्नई) शहराची सुरवात केली.

### जन्म

१९६४: मॅट्स विलँडर — स्वीडीश टेनिस खेळाडू
१९५५: चिरंजीवी (कोणिदेल शिवशंकर वरप्रसाद) — भारतीय तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता, निर्माते आणि राजकारणी — पद्मविभूषण, पद्मभूषण, फिल्मफेअर पुरस्कार
१९३५: पंडित गोपीकृष्ण — कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. (निधन: १८ फेब्रुवारी १९९४ )
१९३४: जॉन एनकोमो — झिम्बाब्वे देशाचे उपाध्यक्ष, राजकारणी (निधन: १७ जानेवारी २०१३ )
१९२२: हरिशंकर परसाई — भारतीय लेखक, विडंबनकार आणि विनोदी लेखक (निधन: १० ऑगस्ट १९९५ )
१९२०: डेंटन कुली — हृदयरोपण शस्त्रक्रियेचे जनक (निधन: १८ नोव्हेंबर २०१६ )
१९१९: गिरिजाकुमार माथूर — हिंदी कवी (निधन: १० जानेवारी १९९४ )
१९१८: बानू कोयाजी — कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणाऱ्या — पद्म भूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार (निधन: १५ जुलै २००४ )
१९१५: जेम्स हिलियर — इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे रचनाकार, कॅनेडियन-अमेरिकन

### मृत्यू

२०२२: ए. जी. नाडियादवाला — भारतीय चित्रपट निर्माते
२०२२: आर. सोमशेखरन — भारतीय गायक, संगीतकार
२०१८: कृष्णा रेड्डी — भारतीय मुद्रक, शिल्पकार आणि शिक्षक (जन्म: १५ जुलै १९२५ )
२०१६: एस. आर. नाथन — सिंगापूर देशाचे ६वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३ जुलै १९२४ )
२०१४: यू.आर. अनंतमूर्ती — भारतीय लेखक, कवी आणि नाटककार (जन्म: २१ डिसेंबर १९३२
२०१४: जॉन स्पर्लिंग — अमेरिकन उद्योगपती, फिनिक्स विद्यापीठाचे संस्थापक (जन्म: ९ जानेवारी १९२१ )
२०००: अबुलफाज एलचिबे — अझरबैजान देशाचे २रे राष्ट्रपती (जन्म: २४ जून १९३८ )
१९९९: सूर्यकांत मांढरे — मराठी चित्रपट रंगभूमीवरील अभिनेते
१९९५: पं. रामप्रसाद शर्मा — संगीतकार, ट्रम्पेट व्हायोलिनवादक
१९८९: पं. कृष्णराव शंकर पंडित — ग्वाल्हेर घराण्याचे प्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक आणि संगीत परंपरेचे श्रेष्ठ आचार्य — पद्मभूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, तानसेन पुरस्कार




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२१ ऑगस्ट**

## कॅडिलॅकची स्थापना; आलिशान मोटारींच्या युगाची सुरुवात

१९०२ मध्ये अमेरिकेतील ऑटोमोबाइल उद्योगाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना घडली. कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना झाली. पुढे कॅडिलॅक हे नाव आलिशान, दर्जेदार आणि अत्याधुनिक मोटारींसाठी जगभर प्रसिद्ध झाले. आज कॅडिलॅक हा अमेरिकन वाहन उद्योगातील प्रतिष्ठित ब्रँड म्हणून ओळखला जातो.कॅडिलॅकची सुरुवात डेट्रॉईट, मिशिगन येथे झाली. कंपनीच्या स्थापनेमागे अमेरिकेतील प्रसिद्ध वाहन अभियंता हेन्री मार्टिन लेलंड यांची महत्त्वाची भूमिका होती. लेलंड यांनी अचूक अभियांत्रिकी, सुट्या भागांमध्ये प्रमाणबद्धता आणि उत्पादनातील उच्च दर्जा यांना विशेष महत्त्व दिले. त्यामुळे कॅडिलॅकच्या सुरुवातीच्या वाहनांमध्ये मजबूत बांधणी आणि विश्वासार्हता यावर भर देण्यात आला.कॅडिलॅकच्या नावामागेही एक ऐतिहासिक संदर्भ आहे. डेट्रॉईट शहराची स्थापना करणाऱ्या फ्रेंच संशोधक अँटोनी द ला मोथे कॅडिलॅक यांच्या नावावरून कंपनीला 'कॅडिलॅक' हे नाव देण्यात आले. कंपनीने सुरुवातीपासूनच वाहननिर्मितीत अचूकता आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न केला.१९०३ मध्ये कॅडिलॅकने आपल्या वाहनांचे प्रदर्शन केले आणि त्यानंतर कंपनीला मोठी प्रसिद्धी मिळू लागली. वाहनांच्या निर्मितीमध्ये सुट्या भागांचे परस्पर बदलता येणे, म्हणजेच interchangeable parts, या संकल्पनेचा प्रभावी वापर करण्यासाठी कॅडिलॅक विशेष प्रसिद्ध झाली. उत्पादन प्रक्रियेत अचूक मापदंड निर्माण करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल होते.१९०८ मध्ये कॅडिलॅकला Dewar Trophy हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला. वाहनांच्या गुणवत्तेबरोबरच तांत्रिक अचूकतेसाठी कंपनीची ओळख अधिक मजबूत झाली. पुढील काळात कॅडिलॅकने इलेक्ट्रिक स्टार्टर, प्रकाशयंत्रणा आणि विविध आधुनिक वाहन तंत्रज्ञानाच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावली.१९०९ मध्ये कॅडिलॅकचा General Motors (GM) समूहात समावेश झाला. त्यानंतर कंपनीने लक्झरी वाहनांच्या बाजारपेठेत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. मोठ्या आकाराच्या मोटारी, शक्तिशाली इंजिन, आकर्षक डिझाइन आणि अत्याधुनिक सुविधा यामुळे कॅडिलॅक हळूहळू अमेरिकन श्रीमंती आणि प्रतिष्ठेचे प्रतीक बनले.कॅडिलॅकने केवळ वाहनांची निर्मिती केली नाही, तर अमेरिकेच्या मोटार उद्योगातील अनेक तांत्रिक बदलांना चालना दिली. वाहनांमध्ये आराम, सुरक्षितता, कार्यक्षमता आणि आकर्षक डिझाइन यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न कंपनीने सातत्याने केला.१९०२ मध्ये झालेली कॅडिलॅकची स्थापना ही केवळ एका वाहन कंपनीची सुरुवात नव्हती, तर अमेरिकन लक्झरी ऑटोमोबाइल उद्योगाच्या एका नव्या पर्वाची सुरुवात होती.

# कृष्णा रेड्डी - भारतीय मुद्रक, शिल्पकार आणि शिक्षक

**पुण्यतिथी विशेष**

कृष्णा रेड्डी (१५ जुलै १९२५ – २२ ऑगस्ट २०१८) हे भारतातील प्रसिद्ध मुद्रक, शिल्पकार आणि कला शिक्षक होते. आधुनिक भारतीय कलेच्या इतिहासात त्यांनी मुद्रणकलेला नवे तांत्रिक आणि कलात्मक स्वरूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः रंगीत इंटॅग्लिओ मुद्रणातील 'व्हिस्कोसिटी प्रिंटिंग' या तंत्राच्या विकासासाठी ते जगभर ओळखले जातात.कृष्णा रेड्डी यांचा जन्म आंध्र प्रदेशातील चित्तूर परिसरात झाला. लहानपणापासूनच त्यांना चित्रकला आणि शिल्पकलेची आवड होती. त्यांनी शांतिनिकेतन येथील विश्वभारती विद्यापीठाच्या कला भवनमध्ये शिक्षण घेतले. तेथे नंदलाल बोस आणि रामकिंकर बैज यांसारख्या दिग्गज कलाकारांच्या मार्गदर्शनाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. शांतिनिकेतनमध्येच त्यांनी लाकडी ठसे, नक्षीकाम आणि मुद्रणकलेच्या विविध माध्यमांमध्ये प्रयोग करण्यास सुरुवात



केली.१९४७ ते १९४९ या काळात त्यांनी चेन्नईतील कलाक्षेत्राच्या कला विभागाचे नेतृत्व केले. त्याच काळात त्यांनी कला शिक्षणातही योगदान दिले. पुढील शिक्षणासाठी ते युरोपमध्ये गेले. लंडनमधील स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्टमध्ये त्यांनी शिल्पकलेचा अभ्यास केला. तेथे हेन्री मूर यांसारख्या कलाकारांच्या कार्याचा त्यांना परिचय झाला. त्यानंतर पॅरिसमध्ये त्यांनी ऑसिप झाडकिन यांच्याकडून शिल्पकलेचे प्रशिक्षण घेतले आणि स्टॅन्ली विल्यम हेटर यांच्या Atelier 17 या प्रसिद्ध मुद्रणकला केंद्राशी जोडले गेले.Atelier 17 मध्ये कृष्णा रेड्डी यांनी रंगीत मुद्रणाच्या तंत्रावर मोठ्या प्रमाणात प्रयोग केले. याच प्रयोगांतून त्यांनी व्हिस्कोसिटी प्रिंटिंग तंत्र विकसित केले. या पद्धतीत एकाच प्लेटवर विविध रंगांच्या शाईचा वापर करून एकाच प्रक्रियेत अनेक रंगांचे प्रभाव निर्माण करता येतात. त्यामुळे रंगीत इंटॅग्लिओ मुद्रणाच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडली.कृष्णा रेड्डी यांच्या कलाकृतींमध्ये निसर्ग, मानवी जीवन, हालचाल, विश्व आणि अमूर्त आकार यांचे प्रभाव दिसून येतात. त्यांच्या मुद्रणकलेत रेषा, पोत, रंग आणि आकार यांचा सुंदर मिलाफ आढळतो. त्यांच्या अनेक कलाकृतींमध्ये निसर्गातील झाडे, लाटा, फुले, सागरी जीव आणि मानवी आकृती यांचा कलात्मक वापर दिसतो. त्यांच्या कलाकृती जगातील अनेक नामांकित संग्रहालयांमध्ये जतन करण्यात आल्या आहेत.कला शिक्षक म्हणूनही कृष्णा रेड्डी यांचे योगदान मोठे होते. त्यांनी भारताबरोबरच अमेरिका आणि युरोपमध्ये कार्यशाळा, व्याख्याने आणि प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. १९७६ मध्ये ते न्यूयॉर्कला गेले आणि न्यूयॉर्क विद्यापीठात ग्राफिक्स व प्रिंटमेकिंग विभागात प्राध्यापक आणि संचालक म्हणून कार्य केले. त्यांनी कलाकार, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी 'Colour Print Atelier' ही कार्यशाळाही उभारली.भारतीय कलेतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी भारत सरकारने १९७२ मध्ये पद्मश्री पुरस्काराने त्यांचा गौरव केला.२२ ऑगस्ट २०१८ रोजी न्यूयॉर्क येथे वयाच्या ९३व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय आधुनिक कला आणि मुद्रणकलेतील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा अंत झाला. मात्र, त्यांनी विकसित केलेली तंत्रे, त्यांच्या कलाकृती आणि त्यांनी घडवलेली कलाकारांची पिढी यामुळे त्यांचा कलाक्षेत्रातील वारसा आजही कायम आहे.





दैनिक **युवावार्ता**


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

परिवर्तनाचा पुरस्कर्ता



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# सण-उत्सवांच्या काळात संगमनेरची व्यवस्था सुरळीत राहणार - नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरातील नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा सुरळीतपणे उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नगरपरिषद प्रशासनाने आतापासूनच तयारी सुरू करावी, अशी भूमिका नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी घेतली आहे. त्यामुळे दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीच्या काळात शहरातील बाजारपेठा व प्रमुख भागांमध्ये होणारी मोठी गर्दी लक्षात घेता, मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी शहराचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करून पुढील तीन महिन्यांचा अहवाल तयार करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.



या काळात शहरातील मुख्य बाजारपेठा, व्यापारी परिसर, प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांची वर्दळ वाढते. त्यामुळे स्वच्छता, कचरा संकलन, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, अंधाऱ्या ठिकाणी प्रकाशव्यवस्था, वाहतूक आणि पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी मुख्याधिकारी यांनी नगरपरिषद कार्यक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागप्रमुखांशी चर्चा करावी. प्रत्येक विभागाच्या कार्यक्षेत्रातील आवश्यक कामे निश्चित करून त्यानुसार जबाबदारी ठरवावी.

तसेच या सार्वजनिक कार्यक्रमांची माहिती संकलित करून त्यानुसार विभागनिहाय कामांचे नियोजन करावे. त्याचबरोबर या सर्व बाबींचा समावेश असलेला सविस्तर अहवाल व कृती आराखडा पुढील सात दिवसांच्या आत नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्याकडे सादर करावा, असे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांना कळविण्यात आले आहे. नागरिकांना कोणत्याही गैरसोयीला सामोरे जावे लागू नये आणि शहरातील दैनंदिन व्यवस्था सुरळीत राहावी.

# संगमनेरच्या स्वतंत्र RTO कार्यालयाच्या मागणीला निकषांचा ब्रेक !

## संगमनेर-अकोलेतील २.५४ लाख वाहने; तरीही दोन प्रमुख निकषांवर प्रस्ताव अपात्र

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर आणि अकोले तालुक्यातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी असलेल्या संगमनेरातील स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रस्तावाला शासनाच्या कडक निकषांचा मोठा अडथळा निर्माण झाला आहे. शासन निर्णयानुसार गठित समितीने केलेल्या छाननीत संगमनेर-अकोलेचा संयुक्त प्रस्ताव प्रमुख निकषांपैकी दोन निकषांवर अपात्र ठरला आहे. त्यामुळे इतकी वर्षे मागणी करूनही स्वतंत्र ठढज कार्यालयाचा प्रस्ताव निकषात का बसवता आला नाही? हा सत्ताधारी आणि विरोधक दोघांचाही राजकीय अपयश आहे का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

संगमनेर तालुक्यात १ लाख ८२ हजार २२३, तर अकोले तालुक्यात ७२ हजार ३६९ वाहने आहेत. दोन्ही तालुक्यांची एकत्रित वाहनसंख्या २ लाख ५४ हजार ५९२ इतकी आहे. मात्र शासनाच्या निकषानुसार नवीन प्रस्तावित परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किमान ५ लाख वाहने असणे आवश्यक आहे. त्यामुळे हा महत्त्वाचा निकष पूर्ण होत नसल्याचे समितीच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

याशिवाय, संगमनेर तालुक्यात २ हजार ६१६ आणि अकोले तालुक्यात ५७७, अशी एकूण ३ हजार १९३ योग्यता प्रमाणपत्र (ऋळींपशीी उशीींळषळलरींश) नूतनीकरणाची प्रकरणे आहेत. स्वतंत्र कार्यालयासाठी वर्षाला १५ हजार योग्यता प्रमाणपत्र चाचण्या आवश्यक असताना हा निकषही पूर्ण होत नाही. तसेच स्वतंत्र परिवहन कार्यालयासाठी वर्षाला ३० हजार अनुज्ञप्ती (ऊीर्ळींळपस ङळलशपलश) चाचण्या होणे अपेक्षित आहे. संगमनेर-अकोलेचा प्रस्ताव या निकषातही पात्र ठरत नसल्याचे समोर आले आहे.

सध्या जिल्ह्यात अहिल्यानगर आणि श्रीरामपूर येथे परिवहन कार्यालये कार्यरत आहेत. वाहन परवाना, वाहन पासिंग, योग्यता प्रमाणपत्र आणि आरटीओशी संबंधित विविध कामांसाठी संगमनेर व अकोले तालुक्यातील नागरिकांना श्रीरामपूर येथे जावे लागते.

संगमनेर ते श्रीरामपूर हे अंतर सुमारे ५२ किलोमीटर, तर अकोले ते श्रीरामपूर हे अंतर तब्बल ७७ किलोमीटर आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात खर्च होतात. ही गैरसोय दूर करण्यासाठी संगमनेरात स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे.

दरम्यान, नवीन परिवहन कार्यालयाचे ठिकाण जिल्ह्यातील विद्यमान परिवहन कार्यालयापासून निर्धारित अंतरापेक्षा अधिक अंतरावर असावे, या निकषाच्या दृष्टीने संगमनेर पात्र ठरत असल्याचे अहवालातून दिसून येते. मात्र वाहनसंख्या, योग्यता प्रमाणपत्र चाचण्या आणि अनुज्ञप्ती चाचण्यांच्या निकषांमुळे प्रस्ताव अडचणीत आला आहे.

संगमनेर-अकोलेतील नागरिकांची वर्षानुवर्षांची गैरसोय लक्षात घेता स्वतंत्र ठढज कार्यालयाची मागणी केवळ प्रशासकीय नव्हे, तर राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची ठरली आहे. मात्र शासनाच्या निकषांमध्ये प्रस्ताव पात्र ठरवण्यात अपयश आल्याने सत्ताधारी आणि विरोधकांनी या प्रश्नासाठी केलेल्या पाठपुराव्याचे फलित नेमके काय? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.





























दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25